# College of Agricultural Engineering and Technology
Dr. BALASAHEB SAWANT KONKAN KRISHVIDYAPEETH,
DAPOLI, DIST. RATNAGIRI.
**Phone: (02358) 282414; Tele-Fax: (02358) 282414**
**Email : caetdapoli@gmail.com**

**Dr. Y.P. Khandetod**
**Associate Dean**


No. CAET/ AICRP-PEASEM / 392/2021
Date: 5 MAR 2021

प्रति,

.............................
.............................
.............................

**विषय:** ट्रक भाडयाने पुरवण्याकरता दरपत्रक पुरवणेबाबत......

महोदय,

कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली अंतर्गत प्रक्षेत्र संरचना विभागात कार्यरत असलेल्या, "अखिल भारतीय समन्वित संशोध प्रकल्प— प्लास्टिक इंजिनीअरिंग इन ॲग्रीकल्चर स्ट्रक्चर्स ॲड एन्व्हार्यमेंट मॅनेजमेन्ट" या योजनेंतर्गत ''बांबु ग्रीनहाऊस'' संशोधनासाठी लागणारे बांबु ट्रकमधुन वाहतुक करण्यासाठी मिनी ट्रक शासनमान्य पध्दतीने भाडयाने घेणे आहे. व त्यासाठी सोबतच्या ''दरपत्रक नमुन्यात'' दरपत्रके मागविण्यात येत आहेत. यानुसार, ट्रकला प्रत्येक दिवशाचे भाडे दिले जाईल. तसेच प्रती ठरावीक कि.मी. मागे १ लि. डिझेल याप्रमाणे डिझेलचा खर्च दिला जाईल. डिझेलचा दर प्रत्येक ठिकाणानुसार प्रत्यक्ष दर विचारात घेऊन सर्व दरांची सरासरी काढुन अदा केला जाईल. तरी सदर दरपत्रक सोबत जोडलेल्या नमुन्यात तसेच दिलेल्या अटी शर्ती नुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दिलेल्या अटी व शर्ती मान्य असल्यासच दरपत्रक भरावे. सदर दरपत्रके मा. सहयोगी अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी यांच्या नावे दि. **१२/०३/२०२१** पर्यंत देण्यात यावेत.

आपला विश्वासु,

**सहयोगी अधिष्ठाता**

**सोबत कागदपत्रे**

१. दरपत्रक नमुना व अटी शर्ती

## बांबु वाहतुकीसाठी ट्रक भाडयाने पुरवण्याच्या अटी व शर्ती

१. दरपत्रकात नमुद केलेले दर सर्व करांसहीत असावेत.
२. ट्रकमधुन बांबु वाहतुक करण्याचा मार्ग दापोली, संगमेश्वर, सांगली, भोर व दापोली असा प्रस्तावित आहे.
३. ट्रकमधुन बांबु वाहतुकीसाठी काही शंका असल्यास प्रकल्प प्रमुख (AICRP-PEASEM) यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करूनच दरपत्रक भरावेत. मागाहुन कोणतीही तक्रार चालणार नाही व मंजुर दरपत्रका व्यतिरिक्त कोणतीही जादा रक्कम अदा करता येणार नाही.
४. सदर वाहतुकीचे दर हे नियमानुसार नसल्यास दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता यांना राहिल.
५. बांबु वाहतुकीच्या वेळी टोलचा व पार्किंग चार्जेसचा खर्च या कार्यालयाकडुन करण्यात येईल.
६. वाहनाचा मेन्टेनन्स खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी वाहन पुरवठादाराची राहिल.
७. वाहनाचे/चालकाचे सर्व कागदपत्रे जसे नोंदणी कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परावाना, वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र (पियुसी), चालकाची अनुज्ञप्ती, बॅज इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.
८. मंजुर दरपत्रका व्यतिरिक्त कुठलाही भत्ता चार्जेस देण्यात येणार नाही.
९. नैसर्गिक आपत्ती किंवा बंद किंवा इतर या विभागाच्या नियंत्रणाबाहेरच्या कारणाने ट्रक उभा राहिला/विलंब झाल्यास त्याला हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. व त्या दिवसाचे भाडे देण्यात येणार नाही. याबाबत मा. सहयोगी अधिष्ठाता यांना सर्वाधिकार राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहिल व तो ट्रक पुरवठादारस बंधनकारक राहील.
१०. सदरचे ट्रकचे भाडे हे चालक व मदतीनस यांच्यासह देणे आहे.
११. १२ तासांपर्यंतचा कालावधी अर्धा दिवस धरण्यात येईल व १२ तासांपेक्षा जास्त कालावधी झाल्यास पुर्ण दिवस म्हणजेच २४ तासाचे भाडे देण्यात येईल.

College of Agricultural Engineering and Technology
Dr. BALASAHEB SAWANT KONKAN KRISHVIDYAPEETH,
DAPOLI, DIST. RATNAGIRI.
Phone: (02358) 282414; Tele-Fax: (02358) 282414
Email : caetdapoli@gmail.com

CAET

Date:

## दरपत्रक नमुना

प्रति,

मा. सहयोगी अधिष्ठाता,
कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय,
दापोली

**विषय:** ट्रक भाडयाने पुरवण्याकरता दरपत्रक .....
**संदर्भ:** आपल्या कार्यालयाचे दि. ०५/०३/२०२१ चे दरपत्रक मागणी पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली अंतर्गत "बांबु ग्रीनहाऊस" संशोधनासाठी लागणारे बांबु वाहतुक करण्यासाठी माझे दरपत्रक खालीलप्रमाणे आहे. ट्रकचे भाडे एका दिवसासाठी खालील रकान्याप्रमाणे राहील. तसेच आपण मागणी केल्याप्रमाणे, खालील रकान्यात दर्शविलेल्या कि.मी. मागे १ लि. डीझेलचे चार्जेस द्यावे लागेल. याव्यतिरिक्त कोणतेही चार्जेस देय राहणार नाहीत, हे मला मान्य आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर (रू.) |
|---|---|---|
| १. | मिनिट्रक (जीव्हीडब्ल्यु ७५०० ते १८५०० पर्यंत) प्रति दिन भाडे | प्रति दिन भाडे रू. = |
| २. | ट्रकच्या प्रत्येक किती कि.मी. धाव अंतरामागे १ लि. डिझेलचे चार्जेस आपल्याला हवे आहेत, ते कि.मी. येथे द्यावेत. | ...................... कि.मी. धाव अंतरामागे १ लि. डिझेलचे चार्जेस देणे. |

मी प्रमाणित करतो की, ट्रक भाडयाने पुरवण्याच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत. सदर बांबु वाहतुक करण्याची जबाबदारी पुर्णपणे माझ्यावर राहील. तरी सदर ट्रक भाडयाने पुरविण्याचे माझे दरपत्रक मंजुर व्हावे ही विनंती.

ट्रक पुरवठादाराचे नांव व सही

ट्रक पुरवठादाराचे नाव: .........................................
पुर्ण पत्ता: ..............................................
..................................................
..................................................
मोबाईल नं. : ..............................................
आधार क्र.: ..................................................

## बांबु वाहतुकीसाठी ट्रक भाडयाने पुरवण्याच्या अटी व शर्ती

१. दरपत्रकात नमुद केलेले दर सर्व करांसहीत असावेत.
२. ट्रकमधुन बांबु वाहतुक करण्याचा मार्ग दापोली, संगमेश्वर, सांगली, भोर व दापोली असा प्रस्तावित आहे.
३. ट्रकमधुन बांबु वाहतुकीसाठी काही शंका असल्यास प्रकल्प प्रमुख (AICRP-PEASEM) यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करूनच दरपत्रक भरावेत. मागाहुन कोणतीही तक्रार चालणार नाही व मंजुर दरपत्रका व्यतिरिक्त कोणतीही जादा रक्कम अदा करता येणार नाही.
४. सदर वाहतुकीचे दर हे नियमानुसार नसल्यास दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता यांना राहिल.
५. बांबु वाहतुकीच्या वेळी टोलचा व पार्किंग चार्जेसचा खर्च या कार्यालयाकडुन करण्यात येईल.
६. वाहनाचा मेन्टेनन्स खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी वाहन पुरवठादाराची राहिल.
७. वाहनाचे/चालकाचे सर्व कागदपत्रे जसे नोंदणी कर, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परावाना, वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र (पियुसी), चालकाची अनुज्ञप्ती, बॅज इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.
८. मंजुर दरपत्रका व्यतिरिक्त कुठलाही भत्ता चार्जेस देण्यात येणार नाही.
९. नैसर्गिक आपत्ती किंवा बंद किंवा इतर या विभागाच्या नियंत्रणाबाहेरच्या कारणाने ट्रक उभा राहिला/विलंब झाल्यास त्याला हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. व त्या दिवसाचे भाडे देण्यात येणार नाही. याबाबत मा. सहयोगी अधिष्ठाता यांना सर्वाधिकार राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहिल व तो ट्रक पुरवठादारस बंधनकारक राहील.
१०. सदरचे ट्रकचे भाडे हे चालक व मदतीनस यांच्यासह देणे आहे.
११. १२ तासांपर्यंतचा कालावधी अर्धा दिवस धरण्यात येईल व १२ तासांपेक्षा जास्त कालावधी झाल्यास पुर्ण दिवस म्हणजेच २४ तासाचे भाडे देण्यात येईल.